महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/जात वैधता/२०२४/4080 दिनांक : 10 OCT 2024

**परिपत्रक :-**

**विषय : अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे / अवैध ठरल्यामुळे अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचा-यांना सेवा विषयक / सेवा निवृत्ती विषयक लाभ मंजूर करणेबाबत...**

संदर्भ : महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी ११२३/ प्र.क्र.२९/आरक्षण-२, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२४.

शासन निर्णय दिनांक २१/१२/२०१९ नुसार अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचा-यांना सेवा विषयक (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून) व सेवा निवृत्ती विषयक लाभ अनुज्ञेय करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने तांत्रिक खंड, अर्हताकारी सेवा, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ इत्यादीबाबत संदर्भित शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना व निर्देश देण्यात आलेले आहेत. (सोबत शासन निर्णयाची प्रत सहपत्रांसह जोडली आहे.)

तरी या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था / कार्यालयांनी सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना व निर्देशानुसार उचित कार्यवाही करावी.

(डॉ. द. व्यं. जाधव),
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : प्राचार्य / उपसचिव,
पुणे विभागातील कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था / कार्यालय.

(२) या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.

*D:\my documents\Circular.doc\17*

अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे/अवैध ठरल्यामुळे अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सेवा विषयक/ सेवा निवृत्ती विषयक लाभ मंजूर करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : बीसीसी ११२३/प्र.क्र.२९/आरक्षण-२**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक : ०४ ऑक्टोबर, २०२४.

**वाचा** : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६- ब, दि.२१ डिसेंबर, २०१९.

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २०१९/प्र.क्र.५८१ ए/१६-ब, दि. १४.१२.२०२२.

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी ११२४/ प्र.क्र .४५/ आरक्षण-२ (१६-ब), दि.७.५.२०२४.

३) शासन आदेश, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी११२४/प्र.क्र.४५/आरक्षण-२ (१६-ब), दि.१५.५.२०२४.

**प्रस्तावना :**

या विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ येथील दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सेवा विषयक (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून) व सेवा निवृत्ती विषयक लाभ संदर्भाधीन क्र.२ येथील दि.१४.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय करण्यात आलेले आहेत. तसेच सदर अधिकारी / कर्मचाऱ्यांना मानवतावादी दृष्टीकोनातून व त्यांनी केलेल्या सेवेचा विचार करुन १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुन्हा ११ महिन्याच्या कालावधीकरीता त्यांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरु ठेवण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. सदर ११ महिन्याच्या सेवेनंतरचा १ दिवसाचा तांत्रिक खंड क्षमापित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

शासन निर्णय दि.२१.१२.२०१९ अनुसार अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सेवा विषयक (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून) व सेवा निवृत्ती विषयक लाभ संदर्भाधीन क्र.२ येथील दि.१४.१२.२०२२ च्या शासन

निर्णयान्वये अनुज्ञेय करण्यात आले असून या संदर्भात पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१) दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा प्रत्येक ११ महिन्याच्या सेवेनंतरचा १ दिवसाचा तांत्रिक खंड सर्व सेवा विषयक (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून) व सेवा निवृत्ती विषयक लाभांसाठी क्षमापित करण्यात येत आहे.

२) दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयापूर्वी सेवामुक्त केलेल्या ज्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांची अधिसंख्य पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे, अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा सेवामुक्त केल्याच्या दिनांकापासून अधिसंख्य पदावर पुनर्नियुक्तीपर्यंतचा कालावधी (खंड), महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ अनुसार केवळ निवृत्तीविषयक लाभ मिळणेसाठी क्षमापित करण्यात येत आहे. तथापि, अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा सेवा मुक्त केल्याच्या दिनांकापासूनचा अधिसंख्य पदावर नियुक्ती करेपर्यंतच्या कालावधीची गणना कोणत्याही सेवा विषयक व सेवा निवृत्ती विषयक लाभांसाठी अर्हताकारी सेवा म्हणून ग्राह्य धरण्यात येऊ नये.

३) अधिसंख्य पदावरील अधिकारी/ कर्मचारी पदोन्नतीस पात्र नसल्याने त्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

४) दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयानंतर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या व संबंधित जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या कलम १० व ११ अनुसार कार्यवाही करण्यात यावी.

२. संदर्भाधीन क्र.३ येथील दि.७.५.२०२४ च्या परिपत्रकास संदर्भ क्र.४ येथील दि.१५.५.२०२४ च्या आदेशान्वये स्थगिती देण्यात आलेली आहे. सदर दि.७.५.२०२४ चे परिपत्रक रद्द करण्यात येत आहे.

३. सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना व आस्थापनांना सदर शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन घेऊन त्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे द्याव्यात.

४.  सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४१००४१९००५५१००७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RASIK AMBADAS KHADSE

Digitally signed by RASIK AMBADAS KHADSE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=[illegible], postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=[illegible], cn=RASIK AMBADAS KHADSE
Date: 2024.10.04 18:47:50 +05'30'

**(र. अं. खडसे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.उप मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद
६) मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा
७) सर्व विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्य
८) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
९) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१०) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद)
११) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा)
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई
१६) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१७) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१८) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद
१९) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२०) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२१) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई
२२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२३) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२४) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
२५) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका
२६) संचालक, समाजकल्याण, पुणे

**अनुसूचित जमातीचे जातीचे दावे अवैध ठरलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या सेवेसंबंधी मार्गदर्शक सूचना देणेबाबतचे दि. ०७ मे, २०२४ परीपत्रकास स्थगिती देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन आदेश क्रमांक : बीसीसी-११२४/प्र.क्र.४५/आरक्षण-२ (१६-ब)**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : १५ मे, २०२४.

**संदर्भ :** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१९/प्र.क्र.५८१ ए/१६-ब, दि.१४.१२.२०२२.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-११२४/प्र.क्र.४५/आरक्षण-२ (१६-ब), दि.०७.०५.२०२४.

**शासन आदेश:-**

संदर्भाधीन क्र.२ येथील दि.०७.०५.२०२४ रोजीचे शासन परिपत्रक याद्वारे स्थगित करण्यात येत आहे. तथापि, संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१४.१२.२०२२ च्या शासन निर्णयातील सर्व तरतुदी कायम राहतील.

२. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४०५१५१५०४४१९४०७ असा आहे. सदर शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KHALID BASHIR AHMED ARAB

Digitally signed by KHALID BASHIR AHMED ARAB
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=[illegible], postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=[illegible], cn=KHALID BASHIR AHMED ARAB
Date: 2024.05.15 15:23:26 +05'30'

**( खालिद बी. अरब )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद

अनुसूचित जमातीचे जातीचे दावे अवैध ठरलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या सेवेसंबंधी मार्गदर्शक सूचना देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-११२४/प्र.क्र.४५/आरक्षण-२ (१६-ब)**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ०७ मे, २०२४.

**वाचा** : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि.२१.१२.२०१९.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१९/प्र.क्र.५८१ ए/१६-ब, दि.१४.१२.२०२२.

**शासन परिपत्रक:-**

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याकरीता अथवा ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

२. सदर अधिसंख्य पदांना दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेला ११ महिन्याचा कालावधी संपल्यानंतर पुढील ११ महिने किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत किंवा अभ्यास गटाच्या शिफारशी शासनास प्राप्त होऊन त्यावर शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत दि.२७.११.२०२०, दि.२८.१०.२०२१ व दि.१४.१०.२०२२ च्या शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

३. मंत्रिमंडळाच्या दि.२९.११.२०२२ च्या बैठकीतील निर्णयानुसार दि.१४.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये खालील आदेश देण्यात आले आहेत.

१) अधिसंख्य पदावरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सेवा विषयक तसेच सेवा निवृत्ती विषयक लाभ देण्यात यावेत. यामध्ये पदोन्नती व अनुकंपा धोरण याचा लाभ मिळणार नाही.

२) अधिसंख्य पदावर कार्यरत शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना मानवतावादी दृष्टीकोनातून व त्यांनी केलेल्या सेवेचा विचार करुन १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुन्हा ११ महिन्याच्या कालावधीकरीता त्यांच्या सेवा, सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरु ठेवाव्यात.

४. अधिसंख्य पदावरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना त्यांच्या प्रत्येक ११ महिन्याच्या सेवेनंतर १ दिवसाचा तांत्रिक खंड असल्यामुळे वार्षिक वेतनवाढ तसेच, इतर सेवाविषयक लाभ अनुज्ञेय ठरत नाही. तसेच, अधिसंख्य पदावर वर्ग करण्यापूर्वीची सेवा ही सेवानिवृत्ती विषयक लाभांसाठी अर्हताकारी सेवा म्हणून ग्राह्य धरण्यात यावी.

५. दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार दि.२१.१२.२०१९ नंतर अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना वेतनवाढ मंजूर केली असल्यास ती रद्द करण्यात यावी आणि वेतनवाढीमुळे देय ठरलेली रक्कम संबंधितांकडून वसुल करण्यात यावी.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४०५०७१२४०५९९९०७ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUDAM EKNATH ANDHALE

Digitally signed by SUDAM EKNATH ANDHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=257966df2620df1403d35023802519a4fbdcfcd89479 1eba41c2aef2b4c4b975, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7B57FEE59F0E7101B822A49C72629C21BF9B4D C0BDE136817EE19B6B347E77F4, cn=SUDAM EKNATH ANDHALE
Date: 2024.05.07 12:54:44 +05'30'

**(सु. ए. आंधळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद
६. मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा
७. सर्व विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्य
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
९. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१०. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद)
११. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा)
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१७. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१८. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद
१९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२०. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२१. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२३. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२४. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
२५. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका